# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक तात्काळ**

क्रमांक- रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१८/का.५
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक - १२/३/२०१२

प्रति,
आयुक्त, सर्व महानगरपालिका
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका
मतदान यंत्र सेट व सील करणेबाबत..

महोदय,

स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता मतदान यंत्र सेट व सील करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकरिता असलेल्या सूचना पुस्तिकेमध्ये तसेच मतदान केंद्राध्यक्षांकरिता असलेल्या सूचना पुस्तिकेमध्ये सविस्तर सूचना दिल्या आहेत. मतदान यंत्र योग्यरितीने सेट व सील करण्यासाठी सदर सूचना पुन्हा येथे थोडक्यात खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहेतः-

१) **मतपत्रिका छपाई-** निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या निश्चित झाल्यानंतर मतदान यंत्र लावण्याकरिता विहित आकारमानाची मतपत्रिका छपाई करण्यात यावी.

२) **पहिल्या बटणापासून उमेदवार सेट करावेत-** पहिल्या मतपत्रिकेचा तपशील पहिल्या बटणासमोर येणाऱ्या उमेदवाराच्या नावाच्यावर असलेल्या रिकाम्या जागेत छापण्यात यावा.

३) **मतपत्रिका-** सर्वसाधारणपणे राज्य निवडणूक आयोगाच्या एका बॅलेट युनिटवर १५ उमेदवारांची मतपत्रिका लावता येते. बॅलेटींग युनिटवरील शेवटचे बटण End बटण असून बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार निवडणुकीत हे बटण शेवटच्या बॅलेटींग युनिटवर

अथवा एकच बॅलेटींग युनिट असल्यास पहिल्या बॅलेटींग युनिटवर सुरु राहील. मात्र जर बहुसदस्यिय प्रभाग पध्दतीमध्ये एकापेक्षा जास्त मतपत्रिका लावायच्या असतील त्यावेळी "अ" जागेच्या मतपत्रिकेनंतर एक बटण मास्क करण्यात यावे व त्यानंतर "ब"जागेची मतपत्रिका लावावी. अशाप्रकारे मतपत्रिका लावताना जर एका खालोखाल मतपत्रिका लावल्याने जितकी बॅलेट युनिट आवश्यक आहेत तितकीच बॅलेट युनिट जर स्वतंत्र बॅलेट युनिटवर मतपत्रिका घेतल्याने लागत असतील तर स्वतंत्र बॅलेट युनिटवर मतपत्रिका लावण्यास हरकत नाही.

४) **मतदान यंत्र सेट व सील करण्याची वेळ व ठिकाण-** मतदान यंत्र सेट व सील करण्याची वेळ व ठिकाण याबाबत संबंधित उमेदवार / त्याचा प्रतिनिधी यांना कळवून उपस्थित रहाण्याच्या सूचना द्याव्यात.

५) **मतदानाचे प्रात्यक्षिक** -मतदान यंत्र सेट व सील करण्याच्या ठिकाणी संबंधित उमेदवार व त्यांचा प्रतिनिधी यांना मतदान यंत्राची संपूर्ण कल्पना द्यावी तसेच मतदान यंत्रावर निकाल कशा प्रकारे दिसेल याबाबतही संपूर्ण माहिती / प्रात्यक्षिक देण्यात यावे. मतदान यंत्र सेट व सील करण्यात येत असलेल्या हॉलच्या बाहेर असे प्रात्यक्षिक दाखविण्यात यावे. मतदान यंत्र सेट करताना मॉकपोल करुन दाखविण्याची आवश्यकता नाही कारण सदर मॉकपोल मतदानाच्या दिवशी सकाळी ६.३० वा. मतदान केंद्रांवर घेण्यात येते.

६) **मतदान यंत्रावरील ॲड्रेस टॅगवर निवडणूक निर्णय अधिकारी व उमेदवार/प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या** -मतदान यंत्र सेट व सील करताना बॅलेट युनिट व कंट्रोल युनिटला लावण्यात येणाऱ्या ॲड्रेस टॅगवर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांची स्वाक्षरी किंवा स्वाक्षरीचा शिक्का मारावा. तसेच विभेदक चिन्ह (डिस्टींग्वीश मार्क) मारण्यात यावे. तसेच उपस्थित व इच्छुक असलेल्या उमेदवार / प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्याही ॲड्रेस टॅगवर घेण्यात याव्यात.

७) **राखीव मतदान यंत्रे-** राज्य निवडणूक आयोगाची नवीन मतदान यंत्रे वापरताना जर प्रभागनिहाय राखीव मतदान यंत्रे तयार करण्यात येत असतील तर त्या प्रभागात जितकी मतदान केंद्रे असतील त्या मतदान केंद्रांच्या संख्येच्या पुढील मतदान केंद्र क्रमांक मतदान

यंत्रांमध्ये सेट करण्यात यावे व सदर मतदान केंद्र क्रमांक असलेली यंत्रे राखीव असल्याची स्पष्ट कल्पना उमेदवार / त्याच्या प्रतिनिधींना देण्यात यावी.

८) **मतदान यंत्राबाबत नोंदीचा गोषवारा** -मतदान यंत्रे व इतर साहित्य पेपरसील, पट्टी सील, स्पेशल टॅग इ. संदर्भात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या माहिती पुस्तिकेत जोडपत्र-९ मध्ये मतदान यंत्रांच्या नोंदी ठेवण्याबाबतचे रजिस्टर तसेच जोडपत्र-१० मध्ये मतदान यंत्राबाबत नोंदीचा गोषवारा निश्चितपणे ठेवण्यात यावा.

९) **मॉक पोलबाबत सूचना-** मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राध्यक्षांनी सकाळी ठीक ६.३० वा. मॉकपोल करण्याच्या सूचना प्रशिक्षणात निश्चितपणे द्याव्यात व त्याबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत खात्री करुन घ्यावी.

१०) **उमेदवारांची बैठक-** मतदान यंत्र योग्यरित्या काम करीत आहे याचे प्रात्यक्षिक मॉकपोलद्वारे सर्व संबंधित उमेदवार/ त्यांचे प्रतिनिधी यांना दाखविण्यात येते. त्याकरिता मतदानाच्या दिवशी ठीक ६.३० वा. मॉकपोलकरीता उमेदवारांनी त्यांचे मतदान प्रतिनिधी संबंधित मतदान केंद्रांवर उपस्थित रहातील याची खबरदारी घेणे आवश्यक असून, यासंदर्भातल्या सूचना उमेदवारांच्या बैठकीमध्ये सर्व उमेदवारांना देण्यात याव्यात.

११) **मॉक पोल-** मॉक पोलकरीता मतदान केंद्राध्यक्षाने बॅलेट युनिट व कंट्रोल युनिट आपल्या टेबलवर ठेवावे. प्रथम टोटल बटण दाबून मतदान यंत्रामध्ये कोणतीही मते टाकलेली नाहीत हे दर्शवावे. त्यानंतर बॅलेट बटण दाबून उपस्थित उमेदवार / त्यांचे प्रतिनिधी यांना पसंतीनुसार मतदान करु द्यावे. साधारणपणे सर्व उमेदवारांना किमान एक-एक मत टाकले जाईल हे पहावे. काही उमेदवारांकडून एकापेक्षा जास्त मते टाकण्याची मागणी होऊ शकते. त्यांनी २ ते ३ मते टाकण्यास हरकत नाही मात्र ७.३० वा. मतदान सुरु करणे आवश्यक आहे त्या अंदाजाने मॉकपोल दरम्यान मते टाकावीत. झालेल्या मतदानाची नोंद एका कागदावर नमूद करावी. अशाप्रकारे मतदान झाल्यानंतर टोटल बटण दाबून तपशीलाची नोंद करावी. त्यानंतर क्लोज बटण दाबावे. त्यानंतर रिझल्ट-१ बटण दाबून निकाल दाखवावा. निकाल कागदावर घेतलेल्या मतदानाच्या नोंदीशी जुळत असल्याचे सर्वांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे. त्यानंतर निश्चितपणे क्लिअर बटण दाबून

झालेले मतदान शून्य करावे व ते सर्वांच्या निदर्शनास आणावे.

१२) **कंट्रोल युनिटचे सिलिंग व त्यावर करावयाच्या स्वाक्ष-या-** त्यानंतर कंट्रोल युनिटच्या मागील ऑन/ऑफ स्वीच बंद करुन कंट्रोल युनिट पेपरसील, पट्टीसील व स्पेशल टॅग यांच्या सहाय्याने सील करावे व त्यावर मतदान केंद्राध्यक्ष यांनी त्यांची स्वाक्षरी करावी. तसेच विभेदक चिन्ह (डिस्टींग्वीश मार्क) मारण्यात यावे. तसेच उपस्थित व इच्छुक असलेल्या उमेदवार/प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्याही घेण्यात याव्यात.

१३) **मॉक पोलबाबत नोंद घेणे-** मॉक पोल पार पाडल्यानंतर त्याची स्पष्ट नोंद मतदान केंद्राध्यक्षांनी आपल्या डायरीमध्ये घ्यावी.

१४) **मतदान यंत्रावर दर्शविण्यात येणारा दिनांक व वेळ याबाबतची नोंद** -राज्य निवडणूक आयोगाच्या नवीन मतदान यंत्रावर दिनांक व वेळ दर्शविण्यात येते. जर यंत्रावर दर्शविण्यात येणारा दिनांक व वेळ चुकीची असेल तर मतदान केंद्राध्यक्षांनी आपल्या डायरीमध्ये मतदान यंत्रावर दर्शविण्यात येणारा दिनांक व वेळ नमूद करुन त्यापुढे योग्य दिनांक व वेळ नमूद करावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

आपला,

धमाकानेड

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र